# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in


---

जा.क्र.तंशिविकापु/विवि/२०१८-१९/ ४८२५ दिनांक :- ०५/११/२०१८

**परिपत्रक**

**प्रति,**
**प्राचार्य/संचालक,**
**या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था,**

**विषय :- महाडीबीटीमहाआयटी पोर्टलवर विद्यार्थ्यांना (विमुक्त जाती/जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग प्रवर्गाच्या ) अभ्यासक्रम दिसत नसले बाबत..**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून शिष्यवृत्तीचे अर्ज महाडीबीटीमहाआयटी पोर्टलवर भरण्यात येत असून, VJ/NT/SBC/OBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/फ्रिशिपचे अर्ज भरण्यासाठी Scheme Apply करताना काही अभ्यासक्रम दिसत नसल्याने सदर अभ्यासक्रमांचा समावेश महाडीबीटी पोर्टलवर करणे बाबत या कार्यालयाकडे काही संस्थांकडून विनंती अर्ज प्राप्त झाले आहेत. स्वायत्त संस्थाच्या बाबतीत ही बाब प्रकर्षाने आढळून येत आहे.

या अनुषगाने सर्व संस्थाना सुचित करण्यात येते की, आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/फ्रिशिपचे अर्ज भरण्यासाठी Scheme Apply करताना काही अभ्यासक्रम दिसत नसल्यास अशा अभ्यासक्रमाची माहिती खास दूता मार्फत हस्तदेय पध्दतीने या कार्यालयास दिनांक १३/११/२०१८ रोजी दुपारी ३ वाजेपर्यत सादर करावी. सर्व संस्थांची माहिती एकत्रित करुन अभ्यासक्रमांचा समावेश महाडीबीटीमहाआयटी पोर्टलवर करणेबाबतचा प्रस्ताव मा.आयुक्त समाजकल्याण(विमुक्त जाती/जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग ) यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर माहिती विहित मुदतीत सादर करण्याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी. तसेच कोणताही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहणार नाही यांची खातरजमा करावी. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यास अशा संस्थांची माहिती निरंक समजण्यात येईल.

टिप :- माहिती सादर करताना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अभ्यासक्रम मान्यतेचे पत्र व विद्यापिठाचे संलग्नता बाबतचे पत्र व इतर सहपत्रे सादर करावी.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे मान्यतेने